साप्ताहिक

# हॅलो न्यूज

e-mail-hellonewskrd@gmail.com

HELLO NEWS

संपादक : विशाल वामन पाटील

* सातारा * वर्ष १ * अंक ७ * मराठी * सोमवार १३ जुलै ते १९ जुलै २०२६ * PRGI. MHMAR/26/A3624 * पाने ४ * किंमत ३ रुपये

* Satara * Year 1 * Volume 7 * Marathi * Monday 13 Jully to 19 Jully 2026 * PRGI. MHMAR/26/A3624 * Page 4 * Price 3 Rs.

# निधी मंजूर होऊनही ४५ रस्त्यांचे काम रखडले

## कराड शहरातील रस्त्यांना आ. अतुलबाबा भोसलेंच्या माध्यमातून कोट्यावधीचा निधी मंजूर : भाजप नगरसेवक आक्रमक : बोंबाबोंब आंदोलनाचा इशारा

**कराड (हॅलो न्यूज)**

कराड शहरातील ४५ रस्त्यांना आमदार डॉ. अतुल भोसले आणि महायुती सरकारच्या माध्यमातून कोट्यावधीचा निधी देण्यात आला असून वर्क ऑर्डर निघालेल्या असताना कामे होत नाहीत. तसेच शहरातील घनकचरा, ड्रेनेज व्यवस्था, रस्त्यांची कामे, कचरा गाड्यांकडे दुर्लक्ष होत असून शहरातील नागरिकांचे हाल होत असल्याने भारतीय जनता पक्षाचे सर्वच नगरसेवकांनी मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर यांना चांगलेच धारेवर धरले. येत्या आठवड्यात रस्त्यांच्या कामासोबत इतर प्रश्नावर तोडगा न निघाल्यास कराड पालिकेत बोंबाबोंब आंदोलन करण्याचा इशारा विरोधी पक्षनेते विजय वाटेगावकर यांच्यासह भाजपाच्या नगरसेवकांनी दिला आहे. या बैठकीला नगरसेवक शिवाजी पवार, अजय पावसकर, सुमित जाधव, गणेश पवार, वैष्णवी वायदंडे, आशुतोष डुबल, सुहास जगताप, सुरज माने, सचिन वास्के, अतुल शिंदे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



कराड शहरात बीपीसीएल गॅस पाईप लाईन तसेच एअरटेल मोबाईल कंपनीच्या केबल टाकण्याचे काम सुरू करायचे असल्याने गेल्या तीन महिन्यापूर्वी ठराव होवूनही कामास अजूनही विलंब होत असल्याने रस्त्यांचे काम सुरू न झाल्याने विरोधी पक्षनेते विजय वाटेगावकर आक्रमक झाले. स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका एसआयर कामा संदर्भात राजकीय नेत्यांना बीएलओ कॅम्प घेण्यास परवानगी नसताना. पालिकेतील काही पदाधिकाऱ्यांनी कोणत्या अधिकाराने कॅम्पचे आयोजन केले आहे. तेव्हा आम्हालाही असे कॅम्प आयोजित करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी भाजपचे पदाधिकारी अतुल शिंदे यांनी केली. त्यावर मुख्याधिकाऱ्यांनी कोणत्याही राजकीय नेत्यांना अशा पध्दतीने कॅम्प आयोजित करण्यास परवानगी नाही, असा कोणता कॅम्प आयोजित केला असेल तर तो बेकायदेशीर आहे.

प्रितीसंगम बागेत गाढव फिरण्याचा मुद्दा नगरसेवक अजय पावसकर यांनी उपस्थित केला. तसेच बागेत खाद्य खाण्यास मनाई असताना अनेकदा मंदिर परिसरात नॉनव्हेज खाद्यपदार्थ खाण्यास नेण्यात येत आहे. तेव्हा त्यावर पूर्णपणे व्हेज असो की नॉनव्हेज त्यावर बंदी आणण्याची मागणी केली.

कराड शहरातील तीन बागेत योग्य पध्दतीने व्यवस्था पाहिली जात नाही. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीस्थळी गाढव फिरणे ही अत्यंत गंभीर बाब असून ठेकेदाराची बिल काढू नयेत, अशी एकमुखी मागणी भाजपाच्या नगरसेवकांनी केली आहे.

नगरसेवक आशुतोष डुबल यांनी शहरात मान्सूनपूर्व कामे होण्याची आवश्यकता असताना वृक्षांच्या धोकादायक फांद्या छाटण्यात आल्या नाहीत. तसेच ड्रेनेज स्वच्छता करण्यात आली नाही. तेव्हा प्रशासनाने या कामाकडे लक्ष द्यावे, अशी मागणी केली.

### कराडच्या प्रितीसंगम बागेत नियमावली लावा

कराड शहरातील स्व. यशवंतराव चव्हाण समाधीस्थळावरील बागेत गाढव गेल्याने चार कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आल्याचे मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर यांनी सांगितले. यावर भाजपाच्या नगरसेवकांनी ठेकेदाराचे बिल काढू नये,अशी आक्रमक भूमिका घेतली. तसेच नगरसेवक सुहास जगताप यांनी प्रितीसंगम बागेत नियमावली तसेच पालिकेतील अधिकाऱ्यांचे मोबाईल नंबरचे बोर्ड लावावेत अशी मागणी केली.

### बैलबाजार रोडसाठी १ कोटी ५७ लाखांचा निधी मंजूर तरी काम रखडले

कराड नगरपालिका हद्दीतील बैलबाजार रोड नोव्हेंबर २०२५ महिन्यात मंजूर झाला. या रस्त्यासाठी १ कोटी ५७ लाखांचा निधी आमदार डॉ. अतुल भोसले यांच्या माध्यमातून मिळाला. या कामांची वर्क ऑर्डर ८ एप्रिल २०२६ रोजी मिळाली. यानंतर गॅसपाईप लाईन तसेच मोबाईल कंपनीच्या केबल टाकण्यासाठी आदेश आला. त्यामुळे या रस्त्याच्या गैरसोयीला जबाबदार कोण असा प्रश्न निर्माण होत आहे. तेव्हा मुख्याधिकाऱ्यांना आम्ही भेटून या त्रासातून मुक्तता व्हावी, अशी मागणी नगरसेवक शिवाजी पवार यांनी केली आहे.

### गॅस पाईपलाईन आणि केबलला विलंब का?

कराड शहरातील बीपीसीएल गॅस पाईपलाईन तसेच एअरटेल कंपनीची केबल टाकण्यास विलंब का होत आहे, असा प्रश्न भाजपाच्या नगरसेवकांनी उपस्थित केला. तसेच नक्की कंपनी की अन्य कोणते कारण आहे. याबाबत कंपनीसोबत सर्व नगरसेवकांची बैठक लावण्याची मागणी यावेळी करण्यात आली. अद्याप कंपन्या कारणाने की कोणाच्या दबावाने हे काम रखडून कराड शहराला वेठीस धरत आहेत, यांचा जाब आम्हाला विचारावा लागेल. त्यासाठी येत्या आठवड्यात कंपनीसोबत बैठक लावावी अन्यथा बोंबाबोंब आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# माजी खा. विनायक राऊत यांच्याविरोधात सूनेचे जादूटोण्याचे गंभीर आरोप

## राऊतांच्या अडचणीत वाढ : फिरोज बाबाला अटक : माझ्या कुटुंबावरील आरोप खोटे राऊतांचे स्पष्टीकरण

**मुंबई (हॅलो न्यूज)**

शिवसेना ठाकरे गटाचे नेते तथा माजी खासदार विनायक राऊत यांच्या सुनेने त्यांच्याविरोधात गंभीर आरोप करत गुन्हा दाखल केला असून कापूरबावडी पोलिसांनी याप्रकरणी फिरोज बाबा नावाच्या व्यक्तीला अटक केली आहे. विनायक राऊत यांचा मुलगा गीतेश विनायक राऊत यांची पत्नी यांच्या सात जणाविरोधात हा गुन्हा दाखल झाला आहे. विनायक राऊत शिवसेना ठाकरे गटाचे जेष्ठ नेते आहेत. त्यांचा मुलगा गीतेश यांची पत्नी सध्या घोडबंदर येथील चितळसर मानपाडा भागात वास्तव्यास आहे. १० जून या दिवशी त्यांनी कापूरबावडी पोलीस ठाण्यात राऊत कुटुंबा विरोधात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनुसार २०१६ मध्ये विवाह जुळविणाऱ्या संस्थेकडे त्यांनी नोंदणी केली होती या नोंदणीनंतर त्यांना विनायक राऊत यांचा मुलगा गीतेश यांच्यासोबत विवाह जुळला. डिसेंबर २०१७ मध्ये विवाह झाल्यानंतर मुंबईत बंगला असल्याची खोटी माहिती दिल्याचा दावा तक्रारीत केला. त्यानंतर पतीने तिच्याशी वैवाहिक संबंध ठेवण्यासाठी याबाबत जाब



विचारल्यास शिवीगाळ मारहाण आणि मानसिक छळ केल्याचा आरोपी तिने केला आहे. तसेच सिंधुदुर्ग येथील काजी बाबा आणि फिरोज बाबा या दोघांच्या मदतीने जादूटोणा सारखे अघोरी कृत्य केल्याचेही म्हटले आहे. याप्रकरणी विनायक राऊत यांच्या कुटुंबाविरोधात १० जूनला कापूरबावडी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र नरबळी व अंधश्रद्धा प्रतिबंधक कायद्यासह भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत. या प्रकरणात पोलिसांनी फिरोज बाबा नावाच्या व्यक्तीला अटक केली आहे.

(जागर..)

गिरीजा राऊत यांनी २०२६ मध्ये तक्रार करतात. म्हणजे यामागे काहीतरी काळभैर आहे. या प्रकारावेळी आई-वडील सोबत असायचे असे गिरीजा म्हणते. आई-वडिलांच्या संरक्षणात असताना अघोरी प्रकारावर तक्रार का केली नाही त्यांनी घटस्फोटाची याचीका गेल्या महिन्यात केली आहे आता तडजोड करावी यासाठी दोन्ही वकिलांची बैठक झाली आहे. श्री बीएचके फ्लॅट, टेरेस प्लॅट, पाच कोटी मागितले. इलेक्ट्रिक कार मागितली. त्यानंतर पुन्हा घटस्फोटाची नोटीस धाडली यात कौटुंबिक हिंसाचाराचा उल्लेख आहे. दर महिन्याला पाच लाख रुपये कायमस्वरूपी दहा कोटी रुपये देण्याची मागणी गिरिजांनी केली असल्याचा आरोप विनायक राऊत यांनी केला आहे.



संपादकीय

# विठ्ठला माफ कर, निसर्ग कोपला

आषाढी वारी म्हटलं की वारकऱ्यांना विठ्ठल भेटीची वारीला चालत जावून भेटण्याची ओढ असते. राज्यात नव्हे, देशात नव्हे तर सातासमुद्रच्या पलीकडे आषाढी वारी, वारकरी, पांडुरंग पोहचला आहे. दळणवळणाची साधने उपलब्ध असली तरी वारीतून चालत जाण्याच समाधान हे कैक पटीने असते, ते केवळ वारकरीच सांगू शकतो. वारीत तल्लीन होत, नाचत, गात, अभंग, ओव्या गात वारकरी मंत्रमुग्ध होत असतो. ना भेदभाव, ना उच्चनिच्च, ना गरिब- श्रीमंत, ना धर्मपंथ केवळ वारकरी हाच एक शब्द घेवून विठ्ठलाच्या भेटीची आस असते. मात्र, शेकडो वर्षाची परंपरेला केवळ पावसामुळे अडथळा यावर्षी २०२६ सालात निर्माण झाला आहे. तेव्हा विठ्ठला, पांडुरंगा माफ कर, निसर्ग कोपला म्हणत आम्ही नामनिराळे होत आहोत. या परिस्थितीला जबाबदार निसर्गाला दोष देवून विठ्ठला तुझ्या पायाशी येतील.

नाठाळाच्या माथी हाणू काठी, दुष्टाशी करावी तशीच गोष्टी,<br>
देवासी जो भावे तोचि संत जाणावा, दंभ अभिमान त्यजावा<br>
तुका म्हणे धर्म रक्षावया, प्रसंगी कठोर व्हावे द्या.

तेव्हा विठ्ठला निसर्गावर अन्याय करणाऱ्या, मोठमोठे इमले बांधणाऱ्या नाठाळाच्या माथी काठी हाणण्याची वेळ आली आहे. या दृष्टांना निसर्गावर अन्याय करणाऱ्या अधर्मी लोकांना मोकळीक देवून चालणार नाही. कारण आषाढी वारीतून विठ्ठला तुझा धावा करतील, वारीतील सज्जन असलेल्या वारकऱ्यांशी प्रेमाने वागतील. समाजहित असल्याचे नाटकी रूप घेवून वारकऱ्यांना अधर्माने कमावलेले द्रव्यातून मिष्टान्न देतील. आपण विठ्ठलाचा वारकरी असल्याचे सोंग घेतील. मात्र, पैशासाठी केवळ सामान्य लोकांशीच नव्हे तर निसर्गांशीही दुष्टपणाने, अधर्माने वागतील.

तेव्हा विठ्ठला, पांडुरंगा अन्याय करणाऱ्या या दुष्टांच्या नाठाळाच्या माथी काठी हाणण्याची वेळ आली आहे. अन्यथा पुन्हा पुढील वर्षोनवर्ष हे नाठाळ निसर्गाची हानी करतील. वृक्ष तोडतील, बंगले बांधतील, विकासाच्या नावाखाली पाण्याचे प्रवाह बदलतील आणि पुन्हा पावसाळ्यात आषाढीला रस्त्यावर आलेल्या पाणी पाहून निसर्ग कोपला म्हणतील. तेव्हा विठ्ठला माफ कर कसं म्हणायच, कारण मूठभर लोक निसर्गाची कत्तल करत आहेत. ते उघड्या डोळ्यांनी आम्ही कायम पाहतो, अन् आषाढी वारीला निघालो की रस्त्यात येणाऱ्या पावसाचं पाणी पाहून निसर्गाला दोष देतो. तेव्हा खरचं माफ कर विठ्ठला, निसर्ग कोपला एवढचं गाऱ्हाण मांडत. आजपासून पुन्हा आम्ही शेकडो झाडांची कत्तल करतो अन् पुढच्या वर्षी पुन्हा पूर आल्यास निसर्ग कोपला म्हणतो.

# अफवा अंधश्रद्धेची पेरणी बंद करा

महात्मा फुले, राजर्षी शाहू व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक वारसांना अंधश्रद्धे बाबत कायदा होईल असे वाटले नव्हते. तरीही सध्या हा कायदा अस्तित्वात आहे. गणपतीच्या मूर्तीला दूध पाजणारे मुख्यमंत्री, सत्यसाईबाबाचे पाय धुणारे मुख्यमंत्री अनेक राज्यांना लाभले आहेत त्यांचे मंत्री गण, निवडून आलेले आमदार खासदार हे लोकप्रतिनिधी अनेक बुवांच्या मंदिरांच्या पायऱ्या झिजवताना दिसतात. विविध लोक मुद्दाम धर्मकारण राजकारण एकत्र करताना दिसतात. त्यांच्याकडून अपेक्षा करण्यात अर्थ नाही, सरकारी अधिकारी सरकारी गाडीने सरकारी खर्चाने देवस्थानांना, मठांना, आश्रमांना महिन्याच्या महिन्याला जाऊन भेट देतात. अनेक जण आपल्या श्रद्धेचे व्हाउचर पंधरा दिवसाला किंवा महिन्याला टॉप अप करून घेतात. त्यांना कोण बोलणार अशी किंमती व्हौचर अमावस्येला चतुर्थींना जास्त होतात. सरकारी अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींच्या सहाय्याने हे प्रस्थ वाढवून ठेवले आहे. त्यामुळे देवळांचा व आश्रमाचा टीआरपी सातत्याने वाढताना किंवा वाढवताना दिसून येतो. अशा भाऊ गर्दीत अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीत व समाजकार्य करू इच्छिणाऱ्या नव्या दमाच्या युवक युवती यांना कोण विचारतो आणि त्याविरुद्ध विचारले तर तिथले दलाल गुंड त्यांना जीवाच्या अकांताने पळायला लावायला कमी करणार नाहीत. म्हणूनच आता सावध राहिले पाहिजे अनेक जण वारकऱ्यांच्या सच्चा दिल्याने काम करणाऱ्या संतांचे विचार लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी काम करत असतात .पण काहीजण त्यांचेही डोके धर्माच्या नावाखाली भडकावून देणाऱ्यात धार्मिक नेत्यांना काही वाटत नाही. त्यांच्या कार्यकर्त्यांना संतांचे खरे विचार आणि आचार सांगण्यासाठी काम करणाऱ्यांच्या डोक्यात धार्मिक अंधश्रद्धा बसवायचे काम इमानेइतबारे करतात. ज्योतिषावर ,आकड्यावर, वास्तुशास्त्रावर विश्वास ठेवून दैनंदिन व्यवहारात चमत्कार घडवून देण्याच्या



बहाण्याने लोकांना टोप्या घालून पैसे घेणाऱ्यांना आणि आपल्या नुकसानीचा पाढा इतरांपुढे वाचून दाखवला जात नाही.त्यातून मांढरदेवी, राजस्थानच्या मंदिर वा गुजरात मध्ये चेंगराचेंगरी मध्ये बळी जातात .त्यात बळी पडलेल्यांना कोणी विचारत नाही. धर्मसंस्था ज्यावेळी हावी व्हायला लागते तेव्हा सरकारी नोकरांनी गोळा केलेल्या महसूल हा धर्म देवळांच्या आणि ट्रस्टच्या उत्पन्न पुढे अत्यल्प ठरतो.मग लालबागचा राजा, शिर्डीचे साईबाबा, शनिशिंगणापूर, सिद्धिविनायक व बालाजी देवस्थान यांच्या तिजोरात दरवर्षी कोट्यानी भर पडते. भारतातील देवळांचे, मशिदिंचे, चर्चेचे, आग्यारीचे, बौद्धमठांचे, जैन धर्मस्थळांच्या उत्पन्नाची मर्यादा खूप पुढे जाते. आपल्या भावनाशी कोणी खेळून नारायण नागबळी, यज्ञ, कोटीचं यज्ञ, कल्याण पूजा घालायला लावणाऱ्या लोकांना इथले दारिद्र्य, कुपोषण, उपाशी झोपणारे, अनारोग्य, बालकामगार, बेकारी, त्यांच्या शिक्षणाची आबाळ त्यांचे आरोग्य दिसणार नाही.त्यासाठी अंधश्रद्धांच्या बाजारातून निर्माण झालेली पिलावळ कमी करायची असेल तर यात फायदा कोणाचा व तोटा कोणाचा गब्बर कोण होते अशा प्रश्नांचा भडीमार केला पाहिजे. वैज्ञानिक विचार करायला सुरुवात केली पाहिजे. आपण दिलेल्या दानाचे ठिकाणी पाहिले पाहिजे. राम मंदिरातील लूट किंवा इतर मंदिरातील लूट आपल्याला परिचित झालीच आहे. कायदा काय म्हणतोय यापेक्षा स्वतःचे मन अशा गोष्टीला फसणार नाही. त्याचबरोबर स्वता:चे व कुटुंबातील कोणाचे शारीरिक, मानसिक आणि आर्थिक नुकसान होऊ देणार नाही अशी शपथ युवक आणि युवतींनी घेतली पाहिजे. येथे कोणत्याही धर्माला विरोध करण्यापेक्षा फसवणाऱ्याला आणि फसवण्याच्या प्रवृत्तीला विरोध करणारी फौज तयार झाली पाहिजे. ही युवकांची फौज भविष्यामध्ये भारत घडवण्यासाठी उपयोगी पडू शकते. अशा संवेदनशील वृत्तीचे युवक आणि विद्यार्थी नागरिक लोकशाहीला तारणार आहेत.


सोन्यासारखे जन्माची<br>
आता तरी लाज राख<br>
श्रद्धा अंधश्रद्धेचा खेळ सगळा<br>
डोळे उघडून ठेवून जगा<br>
भलत्या सलत्या अफवांची पिकपेरणी<br>
आता तरी बंद करा<br>
असेच शेवटी म्हणावे लागेल .

**– डॉ. सुधीर कुंभार, ९४२१२१४१३६**<br>
**विज्ञान प्रसारक विद्यानगर सैदापूर कराड**

# प्राची देवकरला आशियाई ॲथलेटिक्समध्ये कांस्यपदक

**कराड (हॅलो न्यूज)**

चीन येथे झालेल्या आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनमध्ये किरपे (ता. कराड, जि. सातारा) येथील प्राची अंकुश देवकर हिने तीन हजार मीटर ट्रिपल चेस स्पर्धा १० मिनिट ३२ सेकंदात पूर्ण करुन देशासाठी कांस्यपदक पटकावले. अत्यंत खडतर परिस्थितीतून पुढे जाऊन प्राचीने (३०००) देशासह राज्याचे नाव कांस्यपदकावर कोरले आहे.




ग्रामीण भागातील एका सर्वसामान्य कुटुंबातून पुढे आलेल्या प्राचीने अथक मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर हा टप्पा गाठला आहे. अत्यंत खडतर परिस्थितीत सराव करत तिने राष्ट्रीय प्रशिक्षक अतुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करुन तिने राष्ट्रीय स्तरावर स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. आता आशियाई स्पर्धेत पदक मिळवत तिने आपल्या कारकिर्दीत आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे.

स्टिपलचेस ही शर्यत वेग, सहनशक्ती आणि अडथळ्यांवर मात करण्याच्या कौशल्याची कसोटी मानली जाते. या स्पर्धेत आशियातील बलाढ्य खेळाडूंच्या उपस्थितीत प्राचीने संयमी आणि आक्रमक धाव घेत कांस्य पदकावर आपले नाव कोरले. तिच्या यशाची बातमी समजताच किरपे गावासह संपूर्ण कराड तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. विविध क्षेत्रांतील मान्यवर, क्रीडाप्रेमी आणि नागरिकांनी तिचे अभिनंदन केले.

# शेतकऱ्यांना कर्जमाफीचा ऐतिहासिक दिलासा

## रामकृष्ण वेताळ यांच्याकडून मुख्यमंत्री फडणवीस यांचे अभिनंदन

**कराड (हॅलो न्यूज)**

भाजपा किसान मोर्चा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांनी आज त्यांच्या कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधताना राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीच्या ऐतिहासिक निर्णयाचे उत्स्फूर्त स्वागत केले. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करणारा ठराव जाहीर करत हा निर्णय राज्यातील लाखो शेतकरी कुटुंबांना नवसंजीवनी देणार आहे आणि त्यांच्या आयुष्यात आशेचा नवा किरण निर्माण करणार असल्याचे सांगितले.

शासनाने शेतकऱ्यांच्या भावना आणि अडीअडचणी ओळखून घेतलेला हा निर्णय राज्याच्या कृषी विकासाच्या दृष्टीने महिलाचा दगड ठरेल असा विश्वास ही त्यांनी व्यक्त केला. श्री वेताळ पुढे म्हणाले शेती हा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, उत्पादन खर्चातील सातत्याने होणारी वाढ, दुष्काळ, बाजारभावातील अनिश्चितता यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले होते. अशा कठीण परिस्थितीत राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या वेदना समजून घेत त्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत कर्जमाफीचा निर्णय घेतला हा निर्णय केवळ आर्थिक मदत नसून शेतकऱ्यांच्या नव्या अशा आकांक्षाला बळ देणारा आणि त्यांच्या आत्मविश्वासात भर घालणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या



नेतृत्वाखाली सरकारने नेहमी शेतकरी शेतमजूर आणि ग्रामीण भागाच्या विकासाला प्राधान्य दिले आहे. सिंचन, पायाभूत सुविधा, कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार, पिक विमा आणि विविध कल्याणकारी योजना द्वारे सरकारने शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. कर्जमाफीचा हा निर्णय त्या प्रयत्नांना अधिक बळ ठरेल.

वेताळ यांनी विश्वास व्यक्त केला की या निर्णयामुळे लाखो शेतकरी कुटुंबांना आर्थिक दिलासा मिळेल.त्यांचे कर्जाचे ओझे कमी होईल आणि नव्या जोमाने शेती करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळेल ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी देण्यासाठी हा निर्णय महत्वपूर्ण भूमिका बजावेल. रामकृष्ण वेताळ यांनी राज्यातील सर्व शेतकरी बांधवांना शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. तसेच भविष्यातही शेतकऱ्यांच्यासाठी भाजप किसान मोर्चा सातत्याने शासनाचे समावेशातून काम करत अशी ग्वाही दिली.

**शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणारा निर्णय..**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलवणारा आहे.प्रत्येक निर्णय हा महाराष्ट्राच्या उज्वल भविष्यासाठी महत्त्वाचा टप्पा आहे. शेतकरी समृद्ध झाला तर महाराष्ट्र समृद्ध होईल. शेतकऱ्याला उन्नती आणि प्रगतीच्या मार्गावर घेऊन जाणारा हा निर्णय आहे .

**– रामकृष्ण वेताळ,**<br>
**प्रदेशाध्यक्ष भाजपा किसान मोर्चा महाराष्ट्र**

* Satara * Vol- 7 * Isshu- 1 * Marathi * Weklly * Page- 4 * Prise Rs- 3/- * PRGI. MHMAR/26/A3624

साप्ताहिक हॅलो न्यूज (PRGI. MHMAR/26/A3624) हे मराठी पत्रक मालक, प्रकाशक, संपादक विशाल वामन पाटील यांनी मुद्रक सचिन काशिनाथ पाटील यांच्या राजमुद्रा ऑफसेट, २३३, सूर्या कॉम्प्लेक्स कराड, जि. सातारा येथे छापून (मुद्रीत) साप्ताहिक हॅलो न्यूज मुख्य कार्यालय २०६/१, वार्ड नं- ४, मु. पो तांबवे, ता. कराड, जि. सातारा ४१५११४ येथून प्रकाशित केला. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीश: संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास कराड न्यायालया अंतर्गत)

Weekly Hello News publisher, Owner and Editor By Vishal Vaman patil has Printed Sachin kashinath Patil, Rajmudra offset, 233, Surya complex karad, Dist - Satara At published weekly Hello News Head office 206/1 ward no -4, At - Post Tambave, Tal - karad, Dist - Satara 415114

# उज्ज्वल भवितव्याची दिव्यकृपा... श्री संतकृपा!

## श्री संतकृपा शिक्षण संस्थेची गरुडभरारी : ग्रामीण भागातून घडतेय गुणवत्तापूर्ण शिक्षणाची नवी क्रांती!

## राष्ट्रीय मानांकनांची शिखरे सर करत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी घडवत आहे यशाचा राजमार्ग

घोगाव (ता. कराड) येथील श्री संतकृपा शिक्षण संस्थेने गेल्या दोन दशकांत शिक्षण क्षेत्रात केलेली प्रगती ही केवळ उल्लेखनीय नसून प्रेरणादायी ठरली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार, गुणवत्तापूर्ण आणि रोजगाराभिमुख शिक्षण देण्याच्या ध्येयातून सुरू झालेली ही संस्था आज राष्ट्रीय स्तरावर मान्यता प्राप्त शैक्षणिक केंद्र म्हणून ओळखली जात आहे.

''यश तुमचं, ध्येय आमचं'' हे ब्रीदवाक्य अंगीकारून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या या संस्थेने गुणवत्ता, शिस्त, आधुनिक सुविधा आणि शैक्षणिक उत्कृष्टतेच्या जोरावर शिक्षण क्षेत्रात आपला स्वतंत्र ठसा उमटविला आहे. कराडपासून अवघ्या २० किलोमीटर अंतरावर, निसर्गरम्य वातावरणात वसलेले हे ज्ञानमंदिर ग्रामीण आणि शहरी भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देत आहे. संस्थेच्या अध्यक्षा डॉ. उषा जोहरी आणि सचिव प्रसून जोहरी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली संस्थेने उल्लेखनीय प्रगती साधली आहे. उच्चशिक्षित आणि तांत्रिक शिक्षणाचा सखोल अनुभव असलेल्या या नेतृत्वाने विद्यार्थीकेंद्रित शिक्षण प्रणाली विकसित करून संस्थेला राष्ट्रीय स्तरावरील मानांकनांच्या उंचीवर नेले आहे.







### राष्ट्रीय मानांकनांची अभिमानास्पद कामगिरी

श्री संतकृपा शिक्षण संस्थेच्या विविध महाविद्यालयांनी राष्ट्रीय मूल्यांकन प्रक्रियेत यश मिळवत संस्थेचा गौरव वाढविला आहे. संस्थेतील डी. फार्मसी महाविद्यालयाने सातारा जिल्ह्यातील पहिले NBA (National Board of Accreditation) मानांकन प्राप्त करणारे महाविद्यालय होण्याचा मान मिळविला. विशेष म्हणजे प्रथम प्रयत्नात सलग तीन वर्षांसाठी हे मानांकन मिळविणारे हे सातारा जिल्ह्यातील पहिले आणि महाराष्ट्रातील सहावे महाविद्यालय ठरले आहे. तसेच बी. फार्मसी महाविद्यालयाने NAAC मूल्यांकनात A+ श्रेणी प्राप्त केली असून अभियांत्रिकी महाविद्यालयाने B+ श्रेणी मिळवून आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटविला आहे. या मानांकनांमुळे संस्थेच्या शैक्षणिक दर्जाची राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेली आहे.

### फार्मसी शिक्षणातील उत्कृष्टतेचा नवा आदर्श..

सन २००४ मध्ये सुरू झालेल्या श्री संतकृपा कॉलेज ऑफ फार्मसीने गुणवत्तेची परंपरा अखंड राखली आहे. शंभर टक्के निकालाची सातत्यपूर्ण परंपरा, विद्यापीठ गुणवत्ता यादीतील यशस्वी विद्यार्थी, राष्ट्रीय स्तरावरील GATE परीक्षेतील यश आणि नामांकित औषधनिर्माण कंपन्यांमधील रोजगाराच्या संधी यामुळे हे महाविद्यालय विद्यार्थ्यांची पहिली पसंती ठरले आहे.

अत्याधुनिक प्रयोगशाळा, समृद्ध ग्रंथालय, संगणक कक्ष, सेमिनार हॉल, मेडिसिनल गार्डन, क्रीडांगण, वाहतूक सुविधा आणि अनुभवी प्राध्यापक वर्ग यामुळे विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शैक्षणिक वातावरण उपलब्ध झाले आहे.

### अभियांत्रिकी शिक्षणाला ग्रामीण भागात नवी दिशा...

ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार अभियांत्रिकी शिक्षण घराजवळ उपलब्ध व्हावे या उद्देशाने २०१७-१८ मध्ये श्री संतकृपा इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंगची स्थापना करण्यात आली. सिव्हिल, इलेक्ट्रिकल, कॉम्प्युटर आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग या आधुनिक आणि रोजगारक्षम शाखांमध्ये शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महाविद्यालयात अत्याधुनिक प्रयोगशाळा, २४ तास इंटरनेट सुविधा, करिअर मार्गदर्शन केंद्र, स्पोकन इंग्लिश व पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट प्रशिक्षण, प्लेसमेंट सेल, शिष्यवृत्ती योजना आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या कॅम्पस मुलाखती यामुळे विद्यार्थ्यांच्या करिअरला भक्कम दिशा मिळत आहे. विशेष म्हणजे ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांना शुल्कामध्ये सवलत देऊन उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याचे सामाजिक कार्यही संस्था सातत्याने करत आहे.

### पॉलिटेक्निकमधून तंत्रशिक्षणाची सुवर्णसंधी

सन २०२२-२३ पासून सुरू झालेल्या पॉलिटेक्निक महाविद्यालयाने तंत्रशिक्षणाचे नवे दालन उघडले आहे. आजच्या युगातील सर्वाधिक मागणी असलेल्या Artificial Intelligence and Machine Learning, Mechatronics, तसेच Civil and Environmental Engineering या अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांना रोजगाराच्या विपुल संधी उपलब्ध होत आहेत.

दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी हे अभ्यासक्रम करिअरची मजबूत पायाभरणी करणारे ठरत असून उद्योगजगताच्या गरजा लक्षात घेऊन अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे.

### गुणवत्तेची परंपरा आणि सर्वांगीण विकास

शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासालाही संस्थेत विशेष महत्त्व दिले जाते. विविध तज्ज्ञांची व्याख्याने, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा, स्नेहसंमेलने आणि सामाजिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो. मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह, सुरक्षित परिसर, माफक दरातील बस सुविधा आणि विद्यार्थीकेंद्रित वातावरण यामुळे पालकांचाही संस्थेवर दृढ विश्वास निर्माण झाला आहे.

**– चंद्रकांत चव्हाण.**
**जनसंपर्क व प्रसिद्धी अधिकारी**

# कृषी अधिकारी पवनकुमार गायकवाड यांचा पुरस्काराने सन्मान

**कराड (हॅलो न्यूज)**

जिल्हा परिषद सातारा यांच्या वतीने देण्यात येणारा उत्कृष्ट कृषी विस्तार अधिकारी हा प्रतिष्ठेचा पुरस्कार कराड पंचायत समितीचे कृषी अधिकारी पवनकुमार गायकवाड यांना प्रदान करण्यात आला. कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, शेतकरी हिताची सातत्यपूर्ण तळमळ आणि विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी याची दखल घेत त्यांना हा सन्मान मिळाला आहे.



पवनकुमार गायकवाड यांना उत्कृष्ट कृषी विस्तार अधिकारी पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल पंचायत समितीचे सभापती, उपसभापती, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, कृषी क्षेत्रातील मान्यवर तसेच शेतकरी बांधवांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# कराडात पिस्टल विक्रीकरीता आलेल्या चौघांना अटक

## कराड शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी : चार देशी बनावटीचे पिस्टल व आठ जिवंत काडतुसे जप्त

**कराड (हॅलो न्यूज)**

देशी बनावटीचे पिस्टल व जिवंत काडतुसे विक्रीकरीता आलेल्या चौघांना कराड शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने मोठ्या शिताफीने ताब्यात घेऊन अटक केली. शासकीय रत्नागिरी गोडावूनच्या पाठीमागे असलेल्या ईदगाह मैदानाच्या मोकळ्या जागेत शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास सदरची कारवाई करण्यात आली. यामध्ये चार देशी बनावटीचे पिस्टल, आठ जिवंत काडतुसे व एक दुचाकी असा सुमारे साडेतीन लाखाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. चौघांना जिल्हा सत्र न्यायालयात हजर केले असता पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली असल्याची माहिती डीवायएसपी राजश्री पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

अफताब बादशाह मोमीन (वय २४), रोहन मेहबुब शेख (वय १९, दोघेही रा. रा. मुजावर कॉलनी, कराड), अमर रघुनाथ पाटील (वय २३, रा. काले, ता. कराड) व ओंकार प्रकाश हिंगणे (वय २५, रा. येडेमच्छिंद्र, ता. वाळवा) अशी पोलीस कोठडी मिळालेल्यांची नावे आहेत.

# ब्रिलियंट अकॅडमीचा जिल्ह्यात दणदणीत यशाचा झेंडा

## ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेत १०१ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत

**सातारा (हॅलो न्यूज)**

ब्रिलियंट अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेच्या जिल्हा गुणवत्ता यादीत उल्लेखनीय यश संपादन करत संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. यंदा संस्थेचे एकूण १० विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले असून जिल्हा गुणवत्ता यादीत तसेच राज्य गुणवत्ता यादीत मानाचे स्थान मिळवले आहे.

जिल्हा गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांमध्ये पवार वरद बजरंग (मराठी माध्यम) यांनी जिल्हा गुणवत्ता क्रमांक ३३, पाटील एकता राजेंद्र (इंग्रजी माध्यम) यांनी जिल्हा गुणवत्ता क्रमांक ५०, अक्षरा सचिन मोरे (सीबीएसई) हिने जिल्हा गुणवत्ता क्रमांक २, राज्य गुणवत्ता क्रमांक १६ व तालुका प्रथम क्रमांक, तोरणे उत्कर्ष विकास (एस.सी. प्रवर्ग, मराठी माध्यम) यांनी एस.सी. प्रवर्गात जिल्हा गुणवत्ता क्रमांक २, पोटे आराध्य गवाराम (मराठी माध्यम, ट्रान्सफर सेट-७) यांनी जिल्हा गुणवत्ता क्रमांक ७, स्वरा सचिन कुंभार (मराठी माध्यम) हिने जिल्हा गुणवत्ता क्रमांक ५८, प्रतीक माणिक पाटील (मराठी माध्यम) यांनी जिल्हा गुणवत्ता क्रमांक ९६, चव्हाण प्राची विवेक (इंग्रजी माध्यम) हिने जिल्हा गुणवत्ता क्रमांक १८७, चोथे वेद विजय (इंग्रजी माध्यम) यांनी जिल्हा गुणवत्ता क्रमांक १८९, तर कापरे सार्थक नितीन (मराठी माध्यम) यांनी जिल्हा गुणवत्ता क्रमांक १९८ मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.

या अभूतपूर्व यशामागे विद्यार्थ्यांची जिद्द, सातत्यपूर्ण परिश्रम, घाडगे सर, अभिषेक सर व पाटील मॅडम, माने मॅडम यांचे कुशल मार्गदर्शन तसेच ब्रिलियंट टीमचे नियोजनबद्ध अध्यापन आणि पालकांचे मोलाचे सहकार्य असल्याची भावना संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आली.



या यशाबद्दल सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे, त्यांचे पालक, घाडगे सर, अभिषेक सर व पाटील मॅडम, माने मॅडम आणि ब्रिलियंट टीममधील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. या यशामुळे परिसरातील विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळणार असून भविष्यातही ब्रिलियंट अकॅडमी अशीच उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# कराड पाटण तालुक्याला ढगफुटी सदृश्य पावसाने झोडपले

कराड (हॅलो न्यूज)
सातार्‍यातील कराड- पाटण तालुक्याला ढगफुटी सुदृश्य पावसाने झोडपून काढले असून ७८ घरांची पडझडी झाल्या असून २२ लोकांचे स्थलांतर करण्यात आले आहे. काल झालेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले.

कराड- चिपळूण रोडवर अनेक ठिकाणी पाणी साचल्याने दोन ते तीन तास वाहतूक पूर्णपणे बंद होती. पाटण शहरातील अनेक घरांत तसेच दुकानात पाणी शिरले. कराड तालुक्यातील कोळे- आणे पूलावर पाणी आल्याने वाहतूकीस बंद केला आहे. तसेच पाटण तालुक्यातील मूळगाव, निसरे, शिंगणवाडी, कुसरूंड, सुळेवाडी आणि तामकणे येथील पूल पाण्याखाली गेले



असून पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. तर ढोरोशी गावाजवळील शिवपुरी रस्त्यावरील फरशी पूल पाण्याखाली गेला असून जवळील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केलेला एका व्यक्तीचा अर्धवट जळालेला मृतदेह पुराच्या पाण्यातून वाहून गेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. अद्याप हा मृतदेह आढळून आलेला नाही.






# आपत्ती ग्रस्तांना जिल्हा परिषद सदस्या मृणाल पाटील यांचा मदतीचा हात

पाटण (हॅलो न्यूज)
सातार्‍यातील पाटण तालुक्यातील ढेबेवाडी विभागाला गेल्या चार दिवसापासून मुसळधार पावसाने झोडपले असून अनेक घरांवरील पत्रे उडाले आहेत. या आपत्तीच्या काळात उद्योजक महेश पाटील आणि जिल्हा परिषद सदस्य मृणाल पाटील यांनी मदतीचा हात पुढे केला आहे. पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या माध्यमातून पीडित कुटुंबांना हेल्पिंग किट (हेल्पींग किट) द्वारे मदत उपलब्ध करून दिली आहे.

ढेबेवाडी विभागातील वरपेवाडी, एकवडेवाडी आणि सातरमधील पीडित कुटुंबांची पाहणी करून तातडीने मदत केली आहे. शासनाच्या मदतीपूर्वीच जिल्हा परिषद सदस्या मृणाल पाटील यांनी मदतीचा हात देत या पिडीत कुटुंबाना आधार दिला आहे. ढेबेवाडी जिल्हा परिषद गटात अजूनही पावसाची संततधार असून लोकांची मोठी गैरसोय होत आहे. प्रशासनही अलर्ट मोडवर असून त्याच्यासोबत पदाधिकारीही कामाला

## ढेबेवाडी विभागातील पिडीतांना हेल्पिंग किट



लागल्याचे यानिमित्ताने पहायला मिळत आहे.

यावेळी जि. प. सदस्या मृणाल पाटील म्हणाल्या, पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या सूचनेनुसार आणि मार्गदर्शनाखाली हे मदतकार्य सुरू करण्यात आले आहे. प्रशासनही पंचानामे करण्यासाठी युध्दपातळीवर काम करत आहे. सध्या ज्या आपतीग्रस्त कुटुंबे आहेत, त्यांना धीर देण्यासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत. लोकांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी मी भागाची लोकप्रतिनिधी म्हणून सदैव सोबत आहे.



## सातारा जिल्ह्याला पृथ्वीराज बाबांसारखे नेतृत्व लाभले, ही जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब : खा. विशाल पाटील

### काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष नामदेव पाटील यांनी घेतली खा. विशाल पाटलांची सदिच्छा भेट

कराड (हॅलो न्यूज)
सातारा जिल्ह्याला पृथ्वीराज बाबांसारखे अभ्यासू, स्वच्छ प्रतिमेचे आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व लाभले, ही जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. काँग्रेसचा प्रत्येक कार्यकर्ता देशात कुठेही गेला तरी अभिमानाने पृथ्वीराज बाबांचे नाव घेऊ शकतो. त्यांच्या विद्वत्तेला आणि प्रशासकीय अनुभवाला खऱ्या अर्थाने तोड नसल्याचे गौरवोद्गार काँग्रेसचे सांगलीचे खासदार विशाल पाटील यांनी काढले.

सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष नामदेवराव पाटील यांनी काँग्रेस पक्षाचे सहयोगी खासदार विशाल पाटील यांची त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. त्यानंतर काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजी विधानपरिषद सदस्य मोहनरावदादा कदम यांचीही सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद घेतले. नव्या जबाबदारीबद्दल मोहनरावदादा कदम यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस अजितराव पाटील- चिखलीकर, मुकेश मोहिते उपस्थित होते. यावेळी झालेल्या मनमोकळ्या संवादात खासदार विशाल पाटील यांनी सातारा जिल्ह्याला लाभलेल्या माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्वाचा गौरव केला.

खासदार विशाल पाटील म्हणाले, नामदेव पाटील आप्पा तुम्ही पृथ्वीराज बाबांच्या सातारा जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष आहात. त्यामुळे काँग्रेसची विचारधारा, पक्षाची मूल्ये आणि जनहिताचा दृष्टिकोन कायम जपण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. काँग्रेस पक्षाने देश आणि राज्याच्या विकासासाठी केलेली ऐतिहासिक कामे जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचली पाहिजेत.

# शेणोलीत 'एमडी ड्रग्ज'चा सौदा उधळला!

### कराड तालुका पोलिसांची कारवाई : ८० हजारांचा मुद्देमाल जप्त

कराड (हॅलो न्यूज)
शेणोली बसस्टँड परिसरात एमडी ड्रग्ज (मेफेड्रोन) विक्रीकरीता आलेल्या दोघांना कराड तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडून १.८९० ग्रॅम वजनाचे एमडी ड्रग्ज (मेफेड्रोन), दोन मोबाईल व एक दुचाकी असा सुमारे ८० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यामध्ये पोलिसांनी एकास अटक केली असून एक विधीसंघर्ष बालक आहे.

अजय यशवंत कापूरकर रा. जुळेवाडी, ता. कराड असे अटक करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे.

अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक धनंजय पाटील करीत आहेत.

# कृष्णा कारखान्याच्या चेअरमनपदी सलग तिसऱ्यांदा डॉ. सुरेश भोसले बिनविरोध

कराड (हॅलो न्यूज)
रेठरे बुद्रक (ता. कराड) येथील यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनपदी डॉ. सुरेश भोसले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तर रेठरे हरणाक्ष (ता. वाळवा,जि. सांगली) येथील संचालक जे. डी. मोरे यांची व्हाईस चेअरमनपदी वर्णी लागली आहे. कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या नुकत्याच झालेल्या पंचवार्षिक निवडणुकीत जयवंतराव भोसले सहकार पॅनलने तब्बल १४ हजार ५०० हून अधिक विक्रमी मताधिक्याने ऐतिहासिक विजयाची हॅट्रिक साधली. अत्यंत प्रतिष्ठेच्या या निवडणुकीत डॉ. सुरेश भोसले व आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या नेतृत्वाखालील जयवंतराव भोसले सहकार पॅनलने सर्व २१ जागांवर दणदणीत विजय मिळवला. या विजयानंतर कृष्णा कारखाना कार्यस्थळावर चेअरमन आणि व्हाईस चेअरमन निवड प्रक्रिया खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

## व्हाईस चेअरमन पदाची वाळवा तालुक्याला संधी



निवडणूक निर्णय अधिकारी सौ. अपर्णा यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या निवड प्रक्रियेवेळी चेअरमनपदासाठी डॉ. सुरेश भोसले यांचा एकमेव अर्ज दाखल झाला. यासाठी कारखान्याचे माजी व्हाईस चेअरमन तथा विद्यमान संचालक जगदीश जगताप हे सूचक; तर संचालक दयानंद पाटील अनुमोदक होते. तसेच व्हाईस चेअरमनपदी जे. डी. मोरे यांनी दाखल केलेल्या अर्जासाठी संचालक सुनील पाटील हे सूचक; तर संचालक सत्यजीत पाटील हे अनुमोदक होते. यानंतर सर्वानुमते चेअरमनपदी डॉ. सुरेश भोसले व व्हाईस चेअरमनपदी जे. डी. मोरे यांची निवड जाहीर

### आप्पासाहेबांच्यानंतर सर्वाधिक काळ चेअरमनपद भूषविण्याचा विक्रम

सहकारमहर्षी जयवंतराव भोसले (आप्पा) यांनी १९६१ ते १९८९ अशी सलग २८ वर्षे कृष्णा कारखान्याचे चेअरमनपद भूषवून सहकार क्षेत्रात आदर्श निर्माण केला. त्यानंतर डॉ. सुरेश भोसले यांनीही १९९९ ते २००५ अशी ६ वर्षे आणि २०१५ ते २०२६ अशी ११ वर्षे असे एकूण १७ वर्षे चेअरमनपद भूषविले आहे. त्यानंतर आता २०२६ ते २०३१ या ५ वर्षांसाठी त्यांची पुन्हा चेअरमनपदी निवड झाली आहे. त्यामुळे सहकारमहर्षी जयवंतराव भोसले (आप्पा) यांच्यानंतर सर्वाधिक काळ चेअरमनपद भूषविण्याचा, तसेच सर्वाधिक वेळा चेअरमनपदी निवड होण्याचा मान डॉ. सुरेश भोसले यांच्या नावावर नोंदवला गेला आहे. तसेच सलग तिसऱ्यांदा चेअरमनपदी निवड होण्याची ऐतिहासिक हॅट्रिकही त्यांनी साधली आहे.

करण्यात आली. सौ. अपर्णा यादव यांच्या हस्ते नूतन चेअरमन डॉ. सुरेश भोसले व व्हाईस चेअरमन जे. डी. मोरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सहाय्यक निबंधक संजय जाधव, राहुल देशमुख, उर्मिला राजमाने उपस्थित होते.

याप्रसंगी संचालक जगदीश जगताप, लिंबाजी पाटील, दयानंद पाटील, धोंडिराम जाधव, आनंदा खबाले, अरविंद पाटील, बाजीराव थोरात, छबन कांबळे, दत्तात्रय देसाई, संभाजीराव पाटील, सत्यजीत पाटील, सुनील पाटील, बाळासो जगताप, संग्राम पाटील, बाबासो शिंदे, अविनाश खरात, बाजीराव निकम, सुजाता जाधव, सुनीता शेवाळे, एक्झिक्युटीव्ह डायरेक्टर सी. एन. देशपांडे, मॅनेजिंग डायरेक्टर बाजीराव सुतार यांच्यासह कराड व वाळवा तालुक्यातील विविध मान्यवर, कार्यकर्ते व ऊस उत्पादक शेतकरी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.